## उंच भरारी घे

घे भरारी, उंच भरारी, उंच भरारी घे
तू करारी, तू प्रहारी, तू उभारी घे

असे आजचा दिस हा उत्सवाचा
करी सार्थ वा मूर्त, का कापरे ?
उदासीनतेचा नसे मार्ग साचा
जरी वाटते काय आता खरे ?

नको चिंतू आता उद्याच्या क्षणांचे
करी मोकळे हास्य आता बरे
नको रात्र बेरात्र घालू उसासे
जगायास हा निमिष आता पुरे

धुके दाटलेले असेना सभोवती
तुझा एक किरण त्याला पुरे
सरे रात्र अंधार ज्या पावलाने
उषा तूच हो, गगन कर साजिरे

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/